# जादूचे स्टारफ्रूट झाड

लेखिका:

रोजालिंड वाँग

चित्रे:

शाओ वेइ लिउ



# जादूचे स्टारफ्रूट झाड

## चीनी लोककथा

मराठी अनुवादः सुशील मेन्सन







फार फार वर्षांपूर्वी चीनच्या दक्षिण भागात *आह-दी* नावाचा एक फळविक्रेता राहात होता. तो अत्यंत कंजूष आणि लोभी होता. कुणालाही तो आवडत नसे. पण त्याच्याकडील स्टारफ्रूट खूप रसाळ आणि चविष्ट असत. दूरदूरहून लोक स्टारफ्रूट खरेदी करण्यासाठी त्याच्याकडे येत.



उन्हाळ्यातील एके दिवशी, फळविक्रेता आपले रसाळ पिवळे स्टारफ्रूट दोन टोपल्यांमध्ये भरून बाजारात चालला. तो मासिक बाजाराचा दिवस असल्याने बाजारात लोकांची गर्दी होती. लोक दुकानात सामान खरेदी करण्यास तसेच डोंबाऱ्याचे खेळ बघण्यास येत. आह-दीने डोंबाऱ्यांजवळच एका झाडाखाली फळांच्या टोपल्या ठेवल्या. मोक्याची जागा मिळाल्यामुळे खुश होत तो मनाशी म्हणाला, “आज खूप गर्मी आहे. लोक तहानेने व्याकुळ होतील आणि माझे रसाळ स्टारफ्रूट विकत घेतील. चांगले पैसे कमावण्याची संधी आहे आज.”

गरीब लोकांना त्याचे स्टारफ्रूट विकत घेणे परवडत नसे. ते फक्त आशाळभूतपणे स्टारफ्रूटकडे बघत उभे राहात. आह-दी खूप क्षुद्र आणि हीन वृत्तीचा होता. तो या लोकांवर खेकसत असे. “तुम्ही विकत घेणार आहात का माझे स्टारफ्रूट? नसाल तर दूर जा. माझ्या धंद्यात व्यत्यय आणू नका.”







दुपारी एक वृद्ध मनुष्य बाजारात आला आणि आह-दीच्या फळांच्या टोपल्यांसमोर येऊन उभा राहिला. त्याचे कपडे मळलेले आणि फाटलेले होते. त्याच्या खिशात एक कवडीसुद्धा नव्हती. त्याच्या हातात फक्त झाडाची एक फांदी होती जी तो काठीसारखी वापरत होता. त्याने डोक्यावर वाळलेल्या गवताची हॅट घातली होती. त्याचा सुरकुतलेला चेहरा धुळीने आणि घामाने डबडबला होता. पण बारकाईने पाहिले तर या वृद्ध मनुष्यात काही वेगळेपण दिसत होते. सूर्यप्रकाशात त्याचे गडद तपकिरी डोळे एखाद्या गूढ मौल्यवान खड्यासारखे चमकत होते.

आह-दीचे रसाळ स्टारफ्रूट दिसल्यावर वृद्ध मनुष्य म्हणाला, “व्वा, काय रसाळ फळं आहेत! मला खूप तहान लागलीय, पण माझ्याकडे पैसे नाहीत फळं विकत घ्यायला. तू खूप दयाळू दिसतोस. या वृद्ध माणसावर दया कर आणि मला एक रसाळ स्टारफ्रूट दे.”

“ए भिकाऱ्या, निघ इथून!” कंजूष आह-दी ओरडला. “हे स्टारफ्रूट विकायला ठेवलेयत. त्यातून मला चार पैसे मिळतात. कुणाला फुकट नाही देत ते मी.”

“अरे उदार फळविक्रेत्या, या पांढऱ्या केसांच्या म्हाताऱ्यावर दया कर. मला मोठ्ठं आणि महागडं फळ नकोय. मला सगळ्यात छोटं फळ दे, जे तू कदाचित फेकून देणार असशील. स्वर्गातला देवांचा राजा तुझ्या दयाळूपणासाठी तुला आशीर्वाद दईल, खरं सांगतो.”

“काय समजतोस तू स्वत:ला?” आह-दी किंचाळला. “देवांच्या राजाचा आशीर्वाद मिळण्यासाठी मला तुझी काय गरज? निघ इथून, नाहीतर बदडेन तुला माझ्या काठीने.”



फळ विक्रेत्याचा मोठा आवाज ऐकून बाजारातील लोक त्यांच्याभोवती गोळा झाले.

“तुला शरम वाटली पाहिजे, फळवाल्या,” एक माणूस म्हणाला. “हा म्हातारा थकलाय, तहानलाय. त्याला एक स्टारफ्रूट दिलंस तर काही नुकसान होणार नाही तुझं. उलट छोट्या स्टारफ्रूटमुळे त्याची तहान भागेल. एवढी दया दाखवलीस तर स्वर्गातला देवांचा राजा तुला नक्कीच काही बक्षीस देईल.”

“बरोबर बोललात तुम्ही,” लोक ओरडू लागले. “म्हाताऱ्यावर दया कर जरा.”

“वा रे वा! बोलायला खूप सोपं असतं हो!” आह-दी ओरडला. “सहज कुणालाही फुकट द्यायला ही काही तुमची फळं नाहीत. ही फळं उगवायला तुम्ही काही काबाडकष्ट केलं नाहीये. एवढे उदार असाल तर तुम्हीच का नाही एक फळ विकत घेऊन या म्हाताऱ्याला देत?”





त्याचवेळी, एक डोंबारी मुलगा *मिंग-मिंग* आपला खेळ लोकांना दाखवून तिथे आला. त्याच्या हातात दोन तांब्याची नाणी होती. त्याने ती नाणी कंजूष आह-दीला दिली.

“या आजोबांसाठी एक फळ विकत द्या मला,” मिंग-मिंग म्हणाला. मग तो वृद्ध मनुष्याकडे वळून विनम्रपणे म्हणाला, “आजोबा, एखादं मोठं, रसाळ फळ निवडा. काळजी करू नका. पैसे दिलेत मी त्याचे.”

वृद्ध मनुष्याला संकोच वाटला. “मी तुझे पैसे कसे घेऊ? हे पैसे कमावण्यासाठी तू खूप मेहनत घेतलीयस.”

“आजोबा, माझ्याकडे फार पैसे नाहीत, पण जे आहे ते मला इतरांना वाटायला आवडतं. मी पुन्हा कसरती करीन आणि हे सगळे दयाळू काका-मावशा मला आणखी पैसे देतील.”

वृद्ध मनुष्याने एक फळ निवडले आणि मधल्या बीपर्यंत खाऊन संपवले. मग त्याने एक बी काळजीपूर्वक हातात धरली आणि बाकी चोथा फेकून दिला.

“व्वा, छान होतं,” तो हसत म्हणाला. “धन्यवाद, बेटा. तू खूप दयाळू आहेस. आता या लोकांना मी एक खेळ दाखवतो, मला मदत कर.”

वृद्ध मनुष्याने आपल्या काठीने मातीत एक खड्डा खोदला. त्याने हातातील बी त्या खड्ड्यात रुजवले. मग त्याने मुलाला खड्डा मातीने भरून पायाने माती दाबायला सांगितले.



"आता या बीला पाणी द्यायला हवं. कुणी मला किटलीत गरम पाणी आणून देईल का?"

त्याची मागणी ऐकून लोक गोंधळले. ते गर्मीचे दिवस होते. गरम पाणी टाकले तर बी मरून गेली असती.

"नक्की, तुम्हाला गरम पाणीच पाहिजे?" कुणीतरी विचारले. लोक एकमेकांकडे बघू लागले. कुणीतरी वृद्ध मनुष्याला सल्ला देईल, असे त्यांना वाटले. काही लोक गुपचुप उभे राहिले. गर्मीमुळे म्हाताऱ्याचे डोके फिरलेय, असे वाटून काही लोकांनी मान डोलावली. शेवटी, कुणीतरी गरम पाण्याची किटली आणली. वृद्ध मनुष्याने पाणी मातीवर शिंपडले.





त्वरीत बीमधून एक अंकुर फुटून रोपटे वर आले. लोक अवाक् होऊन बघू लागले. रोपटे क्षणाक्षणाला वाढू लागले. लोकांची नजर रोपट्याच्या वाढीसोबत वरवर जाऊ लागली. त्यांचे डोके मागे मागे झुकू लागले. शेवटी त्यांना त्या झाडाचा शेंडाच दिसेनासा झाला. रोपटे वाढायचे कधी थांबले हे कुणालाच कळले नाही. पण त्यांची मान मात्र वर बघून बघून अवघडून गेली.

वृद्ध मनुष्य आपली काठी झाडाकडे रोखून म्हणाला, “पानं, माझ्या लाडक्या वृक्षा, पानं उगव!” क्षणातच झाड हिरव्या पानांनी गच्च भरून गेले. खाली कडक उन्हात उभे असलेल्या लोकांवर त्यांची सावली पडली.

लोक आश्चर्याने स्तब्ध झाले. मग वृद्ध मनुष्य पुन्हा आपली काठी झाडाकडे रोखून म्हणाला, “फूल, माझ्या लाडक्या वृक्षा, फुलांचा मोहोर फुलव!” क्षणातच झाड गुलाबी-जांभळी फुलांनी बहरले.





लोक विस्मयाने थक्क झाले. त्यांच्या तोंडून आश्चर्याचे उद्गार बाहेर पडू लागले. तेवढ्यातच, पुन्हा एकदा वृद्ध मनुष्य आपली काठी झाडाकडे रोखून म्हणाला, “फळ, माझ्या लाडक्या वृक्षा, मधुर आणि रसाळ फळं पिकव!” वाऱ्याची हलकीशी झुळुक वाहू लागली आणि झाडावर बहरलेली फुले खाली उभे असलेल्या लोकांवर बरसली. फुलांच्या जागेवर मोठीमोठी, चमकदार स्टारफ्रूट फळे तयार झाली.

दरम्यान, या अद्भूत घटनेची खबर साऱ्या बाजारभर पसरली. आह-दीसह बाजारातील सगळे लोक वृद्ध मनुष्य आणि त्याच्या विलक्षण झाडाभोवती गोळा झाले.

उतावीळ लोकांना शांत करत वृद्ध मनुष्य मिंग-मिंगकडे वळून म्हणाला, “आता तुझा खेळ दाखव. चपळाईने या झाडावर चढ आणि आपल्या सर्वांसाठी गोड, रसाळ फळं तोडून खाली टाक.”

मिंग-मिंग चट्कन झाडावर चढला, अगदी माकडासारखा! तो झाडावरचे स्टारफ्रूट तोडू लागला आणि खाली लोकांकडे टाकू लागला. अगदी कंजूष फळविक्रेत्यालासुद्धा त्याने फळे दिली. आह-दी स्वत:शी विचार करू लागला, “हं....किती विलक्षण! हे स्टारफ्रूट माझ्या टोपलीतल्या फळांसारखेच गोड आणि रसाळ आहेत.”



लोकांनी आपल्याला मिळालेली फळे चाखल्यावर वृद्ध मनुष्य आपली काठी उचलून झाडाच्या बुंध्यावर मारत सुटला. प्रत्येक फटक्यासरशी झाड लहान लहान होत गेले. झाडाची उंची हाताच्या तळव्याइतकी झाली तेव्हा त्याने झाड मिंग-मिंगकडे दिले आणि म्हणाला, “तुझ्या मदतीबद्दल आभार, मुला. हे झाड तुझ्या अंगणात लाव. दर उन्हाळ्यात तुझी तहान भागवण्यासाठी या झाडाला भरपूर स्टारफ्रूट लागतील.” मिंग-मिंगने त्यांचे आभार मानले. वृद्ध मनुष्य आपली काठी उचलून, लोकांना अभिवादन करून, गर्दीतून वाट काढत मळलेल्या रस्त्यावर चालू लागला.





नुकत्याच अनुभवलेल्या घटनेतून लोक अद्याप सावरले नव्हते. अजूनही त्यांचा विश्वास बसत नव्हता. आपण खरोखरच गोड, रसाळ फळ खाल्ले, याची खात्री करण्यासाठी ते ओठांवरून जीभ फिरवू लागले.

अचानक, आह-दीला आपल्या टोपलीतील फळांची आठवण झाली. एवढ्या गर्दीत त्याची सारी फळे खपू शकली असती. पण त्याला त्याच्या दोन्ही टोपल्या रिकाम्या दिसल्या. हे बघून आह-दी मोठ्याने किंचाळला.

“माझे स्टारफ्रूट! माझे स्टारफ्रूट!” कंजूष आह-दी ओरडला. “माझ्या टोपलीतली सगळी फळं गायब झालीयत. त्या दुष्ट म्हाताऱ्यानेच माझी फळं चोरून सगळ्या लोकांना वाटली. अरेरे! मी लुटलो गेलो.”





आपल्या टोपल्या तिथेच टाकून आह-दी वृद्ध मनुष्याला शोधण्यास मळलेल्या रस्त्यावर धावू लागला. पण हाय! त्याला रस्त्याकडेला वृद्ध मनुष्याची फक्त काठीच मिळाली.

लोभी आह-दीची त्रेधातिरपीट पाहून लोक हसू लागले.

“या नीच फळवाल्याला धडा शिकवण्यासाठीच स्वर्गातल्या देवांच्या राजाने त्या वृद्ध माणसाला दूत म्हणून पाठवले असेल,” कुणीतरी म्हणाले.

“हीच लायकी आहे कंजूष फळवाल्याची. तो वृद्ध माणसाशी बरोबर वागला नव्हता,” आणखी कुणीतरी म्हणाले.

लोकांनी मान डोलावून त्याचे समर्थन केले. स्वर्गातील देवांचा राजा शहाणा आणि न्यायप्रिय आहे. जे लोक वृद्ध लोकांशी दयाळूपणे आणि आदराने वागत नाहीत, त्यांना तो शिक्षा देतो. पण जे इतरांची काळजी घेतात आणि आपल्या संपत्तीचा हिस्सा वाटून टाकतात त्यांना तो बक्षीस देतो.



समाप्त